महाराष्ट्र टाईम्स 13 MAY 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# इतिहास आणि विज्ञानाचे नाते घनिष्ठ

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे प्रतिपादन

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

'इतिहास आणि विज्ञानाचे नाते अत्यंत घनिष्ठ असते. पुरातत्त्व संशोधकांनी हे नाते समजून घेतले पाहिजे,' अशी अपेक्षा कुलगुरू डॉ. देवानंद मोरे यांनी व्यक्त केली.

प्राचार्य डॉ. य. ना. कदम यांच्या 'आधुनिक भारताचा इतिहास' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. मोरे यांच्याहस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.

य. ना. कदम हे विद्यार्थ्यांनी स्वीकारलेले शिक्षक असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले. ते म्हणाले, 'कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, 'मेक इन इंडिया आणि मेड इन इंडिया यामधील फरक स्पष्टीकरणासाठी या पुस्तकाकडे पाहिले पाहिजे. पुरातत्व विभागामध्ये काम करणाऱ्यांना इतिहास आणि विज्ञान समजून घेतले पाहिजे. इतिहासलेखन हे जसे आव्हान असते तसेच त्याचे पुनर्लेखनही मोठे आव्हान असते.'

आजचा वाचक तंत्रज्ञानात प्रगत आहे. इतिहास, विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा एका सरळ रेषेत संबंध येतो, असे सांगून ते म्हणाले, 'ऐतिहासिक स्थळे, पुरातन स्थळे आणि धार्मिक स्थळे हे जोपर्यंत समजणार नाहीत तोपर्यंत इतिहास समजणार नाही. त्याशिवाय इतिहासाचे सक्षमीकरणही होणार नाही. इतिहासाचे मळ विकासाकडे जाते. जगात अशा काही घटना घडल्या आहेत की त्यामुळे मानवजातीचा विनाश टळलेला आहे. इतिहासाची ही ताकद समजून घेतली पाहिजे.'

'स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या बहुसंख्या विद्यार्थ्यांना अद्ययावत पुस्तकाचा उपयोग होईल,' असा आशावाद लेखक प्राचार्य य. ना. कदम यांनी व्यक्त केला.'

यावेळी अविनाश पाटील, डॉ. अरुण भोसले, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी मनोगत व्यक्त केले.

बीसीयूडी डॉ. डी. आर. मोरे, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, डॉ. अरुण भोसले, बाबा सावंत, प्रकाशक मोरेश्वर फडके आदी उपस्थित होते. प्राचार्य श्रीधर हेरवाडे यांनी सूत्रसंचालन केले. मंदार फडके यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी
13 MAY 2016

# ३४६६ विद्यार्थ्यांनी दिली पदव्युत्तर प्रवेश परीक्षा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्यावतीने पदव्युतर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी गुरुवारी झालेल्या ऑफलाईन प्रवेश परीक्षेला ३४६६ विद्यार्थी बसले. ३४५ विद्यार्थी अनुपस्थित राहिले.

तीन दिवसांपासून विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा सुरू आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यांत दि. १२ सकाळी १० ते ५ यावेळेत विविध अभ्यासक्रमाच्या परीक्षा झाल्या. शिवाजी विद्यापीठ, सायबर कॉलेज, यशवंतराव चव्हाण इन्स्टिटच्यूट ऑफ सायन्स, सातारा, सायबर कॉलेज, कोल्हापूर, संत गाडगे महाराज महाविद्यालय, कराड, कस्तुरबा वालचंद महाविद्यालय, सांगली ही परीक्षा केंद्र होती. ३८११ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली होती.

एम.ए., एम.एस्सी. भूगोल (३४४), एम.एस्सी. रसायनशास्त्र (२७९९), बी.लिब सायन्स अँड इन्फॉर्मेशन (११६), एम.लिब सायन्स अँड इन्फॉर्मेशन (१३), एम.एस्सी.-एजीपीएम (१९४) असे ३४६६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

दि. १३ मे रोजी एम.एस्सी. झूलॉजी, बायोटेक्नॉलॉजी, बायोकेमेस्ट्री, इन्व्हायरमेंटल बायोटेक्नॉलॉजी, इन्व्हायरमेंटल सायन्स, फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी अभ्यासक्रमाच्या ऑनलाईन पद्धतीने परीक्षा होणार आहेत.

लोकसत्ता 13 MAY 2016 जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

# शिवाजी विद्यापीठाची दुष्काळग्रस्तांना मदत

## ५७ क्विंटल धान्य, तीन ट्रक चाऱ्याचे वितरण

प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाने आपल्या सामाजिक बांधिलकीची प्रचिती देताना विद्यापीठ कार्यक्षेत्रातील दुष्काळग्रस्त भागातील नागरिक आणि त्यांच्या जनावरांसाठी सुमारे ५७ क्विंटल धान्य आणि तीन ट्रक चाऱ्याचे वितरण केले. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी प्रशासकीय सहकाऱ्यांसह सांगली जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त आटपाडी आणि जत तालुक्यांची पाहणी करण्याबरोबरच चार गावांमध्ये प्रत्यक्ष जाऊन मदतीचे वाटप केले.

यंदा दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेऊन विद्यापीठाने विद्यार्थी कल्याण विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या माध्यमातून संलग्नित महाविद्यालयांना मदतीसाठी आवाहन केले होते. तसेच, विद्यापीठ परिसरातही गवत व चारा संकलन केले होते. या माध्यमातून गहू, तांदूळ इत्यादी सुमारे ५७ क्विंटल धान्य गोळा झाले. तसेच सुमारे तीन ट्रक चाराही जमा झाला. या सर्व मदतीचे चार गावांमध्ये वाटप करण्यात आले.

तडवळे (ता. आटपाडी) येथील ४५० कुटुंबांना सुमारे २२ क्विंटल तांदळाचे वाटप करण्यात आले. माडगुळे (ता. आटपाडी) येथील १०० कुटुंबे आणि त्यांची जनावरे यांच्यासाठी १० क्विंटल धान्य व १० क्विंटल सरकी पेंड देण्यात आली. वज्रवाड (ता. जत) येथील १०० कुटुंबे व त्यांच्या जनावरांसाठी १० क्विंटल धान्य व २ ट्रक चारा-गवत देण्यात आले. खिलारवाडी (ता. जत) येथील ५० कुटुंबे व त्यांच्या जनावरांसाठी ५ क्विंटल धान्यासह १ ट्रक चारा देण्यात आला.

या प्रसंगी प्राचार्य डॉ. एस. आर. कारंडे, प्राचार्य डॉ. बी. एन. पवार, राष्ट्रीय सेवा योजना सांगली जिल्हा कार्यक्रम अधिकारी डॉ. सदाशिव मोरे, राजे रामराव महाविद्यालय, जत येथील कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेंद्र लवटे, डॉ. संगीता पाटील, ग्रामस्थ उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Times of India
13 MAY 2016

# Student from SUK guidance centre clears UPSC exam

TIMES NEWS NETWORK



**Kolhapur:** A student from the pre-guidance centre of the Shivaji University, Kolhapur (SUK), has cleared the Union Public Service Commission (UPSC) examination.

**Amogh Thorat**, 28, secured the 966th rank in his fourth attempt at the examination. The results were declared on May 10.

Thorat said during his earlier attempts, he missed clearing the exam by one to six marks, but perseverance and believing in himself helped him stay calm and achieve success. "I was a student of varsity's pre-guidance centre, which helped me a lot in preparing for the toughest examination in the country. Once the course was finished, I chose to study on my own," he said.

SUK vice-chancellor Devanand Shinde congratulated Thorat for his achievement and said aspiring candidates can learn from his experience.

"Thorat's success will definitely inspire other candidates aspiring to join civil services or appear for competitive exams," said the vice-chancellor.

"Like Thorat, many of our students have made us proud with their hard work which is always reflected in their final result. From 2005 to 2014, over 90 students have qualified and been appointed to various positions in the state government," said an official from the university.

The official added that said the pre-guidance centre, which was started in 2004, offers coaching for competitive examinations to students from the backward minority communities.

Students from the reserved categories, and minority communities are eligible.

The centre gets financial help for its functioning from the University Grants Commission (UGC).

It provides guidance for civil services examinations like the Union Public Service Commission and Maharashtra Public Service Commission (MPSC), banking and other competitive examinations.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ
13 MAY 2016

# चला, आपण सारे देशासाठी घडू या...!

## यिन-शिवाजी विद्यापीठातर्फे २३ मेपासून शिबिर; नोंदणीला उत्स्फूर्त प्रतिसाद

YOUNG INSPIRATORS NETWORK
Inspire. Network. Deliver

**सकाळ वृत्तसेवा**


कोल्हापूर, ता. १२ : तारुण्य... नवप्रेरणांचा खळाळता झरा... ज्वलंत धमण्यांचं अविरत स्पंदन. मानाने मिरवायचा आणि काही तरी करून दाखवण्याचा उमेदीचा काळ. शिक्षणाचा एकेक टप्पा पार करीत असतानाच समाजासाठी, देशासाठी काही तरी करण्याची ऊर्मीही गप्प बसू देत नाही. या साऱ्या पार्श्वभूमीवर डिलिव्हरिंग चेंज फाउंडेशनचे यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क-'यिन' आणि शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने २३ मेपासून पदवीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सलग तीन दिवसांचे 'चला, घडू या देशासाठी' निवासी शिबिराचे आयोजन केले आहे.


हमीद दाभोलकर


इंद्रजित देशमुख


तेजस्विनी सावंत


विनायक औंधकर


अरुण देशपांडे


हेमंत शहा


दुर्गेश सोनार

दरम्यान, शिबिरासाठी नावनोंदणीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळू लागला आहे.

राज्यातील सहा विभागांमध्ये ही शिबिरे होणार असून, शिबिरांत राज्यभरातील तज्ज्ञ मंडळी तरुणाईशी संवाद साधणार आहेत. शिबिरात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी निवास व्यवस्थेसह तीन दिवसांचे भोजन, शिबिर कीट, बॅच आणि सहभाग प्रमाणपत्र दिले जाणार आहे. सलग तीन दिवस सकाळी नऊ ते सायंकाळी सात या वेळेत तीन सत्रांत शिबिर होईल. युवक आणि सामाजिक जबाबदारी, आजचा युवक आणि सायबर क्राइम, तरुणाईची कविता कशी बदलली, आजचा युवक आणि त्याचा राजकारणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, तुम्हालाही आयएएस-आयपीएस होतो येते, तुमचं करिअर-तुमची आवड, विवेकवादी तरुणाई आणि चला, खेड्यांकडे अशा विविध विषयांवर हमीद दाभोलकर, आंतरराष्ट्रीय नेमबाज तेजस्विनी सावंत, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी इंद्रजित देशमुख, 'साम'चे वरिष्ठ निर्माता दुर्गेश सोनार, जल अभ्यासक अरुण देशपांडे, कऱ्हाड नगरपालिकेचे मुख्याधिकारी विनायक औंधकर, पोलिस निरीक्षक हेमंत शहा, नुकतेच यूपीएससी परीक्षेत यश मिळवलेला शीतल वाली आदी मंडळी संवाद साधणार असून, हे शिबिर प्रत्येकाला नवी प्रेरणा आणि दिशा देणारे ठरणार आहे. शिबिरासाठी 'यिन' सभासदांना दोनशे रुपये आणि इतर विद्यार्थ्यांना चारशे रुपये प्रवेश शुल्क असेल. चला तर मग आजच नोंदणी करू या...!

### शीतल वाली साधणार संवाद



नुकताच यूपीएससी परीक्षेचा निकाल लागला. त्यात शीतल वाली याने यश मिळवले. मुळात शीतल बारावी अनुत्तीर्ण झाला होता. मात्र, निराशेच्या गर्तेत न जाता पुन्हा त्याने बारावी परीक्षेत यश मिळवले. पदवी घेतल्यानंतर त्याने सलग सात वर्षे अभ्यास करून यूपीएससी परीक्षेत यश मिळवले. त्याचा हा नवप्रेरणादायी प्रवास शिबिरात अनुभवायला मिळणार आहे.

**सहभागासाठी संपर्क क्रमांक**

साईनाथ पाटील (९८५०९४८३५६),
सुशांत पाटोळे (८८८८१६६११४),
राजेश लोकरे (९७६३५७४५४५)

लोकमत
13 MAY 2016
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**पाककृतींचा हिब्रूतून प्रसार : विद्यार्थिनीच्या उपक्रमाला चांगला प्रतिसाद**

# कोल्हापूरच्या चवीची इस्रायली गाथा!

संतोष मिठारी • कोल्हापूर

कोल्हापूरची खाद्य संस्कृती जगात लोकप्रिय आहे. सातसमुद्रापार गेलेल्या या कोल्हापुरी मिसळ, भेळ, पुरणपोळी अशा मराठमोळ्या खाद्यपदार्थांची भुरळ इस्रायलवासीयांनाही पडली आहे. भारतीय संस्कृती व हिंदी भाषा शिकण्यासाठी शिवाजी विद्यापीठात आलेल्या तेल अवीव विश्व विद्यालयातील योनातान देकालो या विद्यार्थिनीमुळे हे प्रत्यक्षात आले असून, यातून तिने रोजगारही उपलब्ध केला आहे. कोल्हापूरची खाद्य संस्कृती इस्रायलमध्येही नक्कीच भरारी घेईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

तेल अवीव विश्वविद्यालयाने भारतीय संस्कृती, हिंदी भाषा व साहित्य हे आपल्या विद्यार्थ्यांना समजून देण्याचा उपक्रम सुरु केला आहे. त्याला तेल अवीवमध्ये कार्यरत असलेल्या एका भारतीय हिरे व्यापाऱ्याने आर्थिक पाठबळ दिले आहे. या उपक्रमांतर्गत गेल्या तीन वर्षांपासून एक सामायिक परीक्षा घेऊन यातील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना भारतातील दिल्ली, महाराष्ट्र, कोलकाता, आदी ठिकाणच्या विद्यापीठांमध्ये हिंदीचे ज्ञान मिळविण्यासाठी तीन महिने पाठविले जाते. याअंतर्गत सप्टेंबर २०१५ मध्ये तेल अवीव विश्वविद्यालयातील हिंदीचे प्राध्यापक डॉ. गेनादी श्लोम्पेर यांनी सहा विद्यार्थ्यांसमवेत शिवाजी विद्यापीठाला भेट दिली. यात योनातान देकालो सहभागी होती. हिंदी संस्कृती, साहित्य, परंपरा जाणून घेताना योनातान देकालो हिला भारतीय खाद्यपदार्थांचे विशेष आकर्षण वाटले.

यातून तिने कोल्हापूरचे वैशिष्ट्य असलेली चटकदार मिसळ, तांबडा-पांढरा रस्सा, भेळ, आदी खाद्यपदार्थांचा आस्वाद घेऊन त्यांची पाककृती हिंदीतून समजावून घेतली. यासह तिने पोहे, पुरणपोळीची माहितीही घेतली. शिवाजी विद्यापीठातील भेट पूर्ण करुन तेल अवीवमध्ये गेल्यानंतर तिने हे खाद्यपदार्थ स्वतः करुन पाहिले. याशिवाय संबंधित पदार्थांची माहिती, ते करण्याची पाककृती तिने हिब्रू भाषेमध्ये स्वतःच्या ब्लॉगस्टॉप व अन्य सोशल मीडियावर उपलब्ध करुन दिली. त्याला इस्रायल, तेल अवीवमधील अनेकांनी प्रतिसाद दिला. त्यामुळे तिने हे पदार्थ तयार करुन देण्याचे काम सुरु केले. त्यातून तिला रोजगार उपलब्ध झाला आहे.



## जसेच्या तसे नसले, तरीही प्रतिसाद

खाद्यपदार्थ बनविण्यासाठी काही साहित्य देकालो ही भारतातून मागवून घेते. चवीच्या बाबतीत हे पदार्थ काही प्रमाणात जसेच्या तसे होत नसले तरी माझ्या या वेगळ्या प्रयोगाला लोकांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे देकालो हिने डॉ. गेनादी यांच्यातर्फे ई-मेलद्वारे शिवाजी विद्यापीठातील डॉ. पद्मा पाटील यांना कळविले आहे.

> तेल अवीव विश्व विद्यालयाचे विद्यार्थी पहिल्यांदाच शिवाजी विद्यापीठात आले होते. हिंदी जाणून घेण्याच्या जिज्ञासेसह त्यांचे व्याकरणही चांगले होते. हिंदी विभागातील विद्यार्थ्यांशी चर्चा करताना योनातान देकालो हिने कोल्हापुरातील खाद्यपदार्थ जाणून घेतले. त्यानंतर पाककृती हिब्रू भाषेत उपलब्ध करण्याचा उपक्रम राबविला. देकालोने सुमारे पाच वर्षे मुंबई, म्हैसूर, केरळ, रामेश्वर, आदी ठिकाणी व्यतीत करुन हिंदी साहित्य व भारतीय खाद्यपदार्थांची माहिती घेतली आहे.
>
> \- डॉ. पद्मा पाटील,
> हिंदी विभागप्रमुख-शिवाजी विद्यापीठ